**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५४/२०१८</u>**

CNR No. MHSO060008772018

सुहास महामुनी

वि.

दिलीप शेंडगे वगैरे

## आदेश निशाणी क्र. १८ आणि निशाणी क्र. १ वर

०१. मुळ नियमित दिवाणी दावा नं. १५६/२०१२ हा पुन्हा फैलावर घेण्यात यावा यासाठी हे प्रकरण दाखल करण्यात आले आहे. मुळ नियमित दिवाणी दावा नं. १५६/२०१२ मध्ये त्रयस्थ इसम दत्तात्रय भिमराव धोत्रे यांनी ते सदर दाव्यातील आवश्यक व जरुरी पक्षकार आहेत त्यामुळे त्यांना दाव्यात सामील करुन घ्यावे असा अर्ज निशाणी क्र. ९६ प्रमाणे दिला होता. तो अर्ज मंजूर झाला. तरीदेखील वादी यांनी त्रयस्थ इसम दत्तात्रय भिमराव धोत्रे यांना दावा निशाणी क्र. १ मध्ये सामील करुन घेतले नाही. त्यामुळे दावा खारीज करण्यात आलेला आहे. तो दावा पुन्हा फैलावर घेण्यासाठी हे प्रकरण दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणामध्ये देखील त्रयस्थ इसम दत्तात्रय धोत्रे यांना पक्षकार केलेले नाही. सबब या प्रकरणामध्ये त्रयस्थ इसम दत्तात्रय भिमराव धोत्रे यांना सामनेवाला या सदरामध्ये सामील करुन घेण्यात यावे यासाठी हा अर्ज देण्यात आला आहे.

०२. अर्जदार यांनी निशाणी क्र. २२ प्रमाणे त्यांचे सविस्तर म्हणणे दाखल केले आहे. त्रयस्थ इसम यांचा या प्रकरणाशी काही संबंध नाही. मुळ दावा नियमित दिवाणी दावा नं. १५६/२०१२ मध्ये निशाणी क्र. ९६ प्रमाणे मा. न्यायालयाने नमूद त्रयस्थ इसम दत्तात्रय भिमराव धोत्रे यांना दाव्यामध्ये सामील करुन घेणेबाबत आदेश दिले होते. परंतु त्या आदेशाविरुध्द अर्जदार यांनी मा.ना. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे रिट पिटीशन नं. १६०४/२०१६ हे दाखल केले आहे. ते प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे या

प्रकरणामध्ये वादी यांनी त्रयस्थ इसम दत्तात्रय भिमराव धोत्रे यांना सामील केले नाही. त्रयस्थ इसम दत्तात्रय भिमराव धोत्रे यांना मुळ नियमित दिवाणी दावा नं. १५६/२०१२ अथवा या प्रकरणामध्ये पक्षकार म्हणून सामील केले तर रिट पिटीशन नं. १६०४/२०१६ मधील मुळ हेतू व प्रयोजन संपुष्टात येईल. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

०३. मुळ नियमित दिवाणी दावा नं. १५६/२०१२ मध्ये न्यायालयाने निशाणी क्र. ९६ वर प्रस्तुत त्रयस्थ इसम दत्तात्रय भिमराव धोत्रे यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामील करण्यात यावे असे आदेश दिलेले आहेत. त्या आदेशाविरुध्द अर्जदार/मुळ वादी यांनी रिट पिटीशन नं. १६०४/१६ हे दाखल केले आहे. ते प्रलंबित असले तरी त्यामध्ये कोणतेही स्थगितीबाबत आदेश नाहीत. आदेश देऊनही जरुरी पक्षकार यांना मुळ दाव्यामध्ये सामील केले नाही म्हणून दावा खारीज करण्यात आला आहे. त्यामुळे प्रस्तुत दावा पुन्हा फैलावर घेण्यासाठीच्या या प्रकरणामध्ये प्रस्तुत त्रयस्थ इसम दत्तात्रय भिमराव धोत्रे हे जरुरी व आवश्यक पक्षकार आहेत. त्यांना या प्रकरणात सामील करणेबाबत निर्देश देणे गरजेचे आहे. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. त्रयस्थ इसम दत्तात्रय भिमराव धोत्रे यांना सामनेवाला क्र. १० या सदरामध्ये सामील करण्यात यावे.

३. त्याप्रमाणे अर्जदार यांनी निशाणी क्र. १ मध्ये दुरुस्ती करावी.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.02.25 11:44:25 +0530

दि. २४/०२/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 24/02/2022 |
| Order uploaded on | : | 25/02/2022 |